सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ३७ | शनिवार, दि. १ नोव्हेंबर २०२५ | पाने : ४

अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

१ नोव्हेंबर

- छत्रपती संभाजी राजे यांच्या फौजेने फोंडा येथे अद्वितीय पराक्रम करून पोर्तुगीजांचा अनोखा पराभव केला.
- मुंबईत आधुनिक पाश्चात्य पद्धतीचे वैद्यकीय शिक्षण देणाऱ्या आद्य ग्रँट मेडिकल कॉलेज या पहिल्या वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रारंभ झाला.
- भारतात भाषिक प्रांतिक रचना अस्तित्वात आली.
- द्विभाषिक मुंबई राज्याची निर्मिती
- दक्षिण भारतातील कन्नड भाषिक प्रदेश एकत्र करून कर्नाटक राज्याची निर्मिती झाली.
- कन्याकुमारी जिल्हा केरळ मधून तमिळनाडूमध्ये हस्तांतरित करण्यात आला.
- म्हैसूर राज्याचे नाव बदलून कर्नाटक करण्यात आले.
- कवी नारायण सुर्वे यांना मध्य प्रदेश सरकारने प्रतिष्ठित कबीर पुरस्काराने सन्मानित केले.
- योगेशकुमार सभरवाल यांनी भारताचे 36वे सरन्यायाधीश म्हणुन कार्यभार सांभाळला.



एकता दौड मध्ये सहभागी झालेल्या सर्व क्षेत्रातील अमळनेरकरांना धावण्यासाठी तिरंगा झेंडा दाखवून प्रारंभ देतांना आमदार अनिलदादा पाटील . (छायाचित्रे : रजनीकांत पाटील)



एकता दौड मध्ये धावणाऱ्या सर्वांचे मनोगत वाढविण्यासाठी स्वत:ही धावतांना आमदार अनिलदादा पाटील.



श्री मंगळग्रह मंदिरात झालेल्या एकता दौडच्या समारोप प्रसंगी उपस्थित असलेले सर्वक्षेत्रातील अमळनेरकर.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

# ' वॉक फॉर युनिटी ' मधून सामाजिक एकोप्याचे दर्शन

## सर्व क्षेत्रांतील अमळनेरकरांचा लाभला उत्स्फूर्त प्रतिसाद

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारताचे पहिले गृहमंत्री आणि " लोहपुरुष " म्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त अमळनेर पोलिस ठाण्यातर्फे शुक्रवार, दि. ३१ रोजी सकाळी महाराणा प्रताप चौकात "वॉक फॉर युनिटी" (एकता दौड) चे आयोजन करण्यात आले होते. एकता दौडला अमळनेरकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

यावेळी सरदार वल्लभभाई पटेल व महाराणा प्रताप यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते तिरंगा झेंडा दाखवून "एकता दौड" ला सुरुवात झाली. महाराणा प्रताप चौकातून सुरुवात झाली. तेथून बस स्थानक, तिरंगा चौक, पैलाड नाका व तेथून श्री मंगळ ग्रह मंदिरात एकता दौडचा समारोप झाला. या समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले होते. पोलीस निरिक्षक दत्तात्रय निकम यांनी आभार मानले. याप्रसंगी भारत माता की जय, वंदे मातरम्, सरदार वल्लभभाई पटेल अमर रहे! अशी जोरदार घोषणाबाजी झाली. शहर आणि ग्रामीण भागातील सामाजिक एकात्मता, बंधुता, सलोखा आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमात अमळनेर शहर व तालुक्यातील राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, विविध संस्थांचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, कर्मचारी, पोलिस पाटील, शाळा-महाविद्यालयांचे शिक्षक, विद्यार्थी- विद्यार्थिनी, पत्रकार बांधव आणि तरुणांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला. समाजात एकात्मता, ऐक्य आणि देशभक्तीचा सशक्त संदेश देण्यात आला. लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्यातून प्रेरणा घेऊन, राष्ट्रीय एकतेसाठी एकत्र राहण्याचा संकल्प सर्वांनी केला.



" आपल्या राष्ट्रावर, राज्यावर, जिल्ह्यावर आणि आपल्या गावावर असलेले प्रेम प्रदर्शित करण्याची संधी आपल्या एकता दौडच्या निमित्ताने लाभलेली आहे. पोलीस आणि प्रशासनाने पुढाकार घेऊन राबविलेला उपक्रम प्रेरणादायी आहे. आपली भारतीय संस्कृती आणि परंपरांची जोपासना करावी. राष्ट्रावर प्रेम करणे, सर्व धर्म समभाव निर्माण करणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. यामुळे सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन एकोप्यात सातत्य ठेवावे.

– **अनिलदादा पाटील**, आमदार, अमळनेर.

शेतरस्ता आदेशाची सात दिवसांत अंमलबजावणी बंधनकारक! ...पान ३ वर

पांडव पंचमीचे महत्त्व काय? तिलाच 'लाभ पंचमी' असे का म्हणतात? ...पान ४ वर

## शेतीमाल हमीभावानेच विका : फडणवीस

शेतकरी कर्जमाफीसह वेगवेगळ्या मागण्यांसदर्भात बच्चू कडू यांच्यासह शेतकरी नेत्यांची बैठक झाली. त्यात शेतकऱ्यांनी कर्जाच्या दृष्ट चक्रातून कायमची सूटका व्हावी यासाठी शेतकऱ्यांनी आपला माल व्यापाऱ्यांना हमीभावानेच विकावा अन्यथा शासनाने सुरू केलेल्या सीसीआय केंद्रावर विकावा. सरकारने निवडणूकीवेळी दिलेल्या जाहीरनाम्याप्रमाणे शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ निश्चितपणे दिला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

# ग्रामीण भागातील महिला मायक्रो फायनान्सच्या जाळ्यात

## कंपन्या मालामाल; महिला कर्जबाजारी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ग्रामीण भागातील महिला मजुरांना वित्तीय पुरवठा करणाऱ्या छोट्या वित्तीय संस्था दहा ते बारा वर्षांपासून कार्यरत आहेत. महिला या मायक्रो फायनान्सच्या जाळ्यात अडकल्या आहेत. या फायनान्समधून दर आठवड्याला लाखो रुपयांची उलाढाल होते. यामुळे अनेक महिला कर्जबाजारी झाल्या आहेत.

फायनान्स कंपन्यांचे प्रतिनिधी गावागावात जाऊन आठ- दहा महिलांचा गट तयार करतात. प्रति महिला ३० हजार हजार रुपयांचे कर्ज देतात. नंतर गटाचा सिबिल कोअर चांगला असल्यास कर्जाची रक्कम वाढवली जाते. या कर्जाची परतफेड दर आठवड्याला करावी लागते. आठवड्याच्या ठरावीक दिवशी मायक्रो फायनान्स कंपनीचे प्रतिनिधी एका विशिष्ट ठिकाणी बसून कर्जाची वसुली करतात. ग्रामीण भागातील मजूर महिलांना नियमित मजुरी मिळत नाही. यामुळे संसार चालवताना आर्थिक अडचणी येतात. मायक्रो फायनान्स कंपनी कर्जाची एक ठोक रक्कम देते. थोड्या थोड्या रकमेने ते वसूल केले जातात. मात्र, फायनान्सचा हप्ता चुकवता येत नसल्याने हप्ता भरण्याकरिता काही महिलांची चांगलीच तारांबळ उडते. बरेचदा या महिलांना खासगी सावकाराचे कर्ज काढून हप्ता भरावा लागतो. त्यामुळे एका कर्जावर दोनदा व्याज भरणा करण्याची वेळ या महिलांवर येते. मोठ्या प्रमाणावर गोरगरीब महिलांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचे दिसून येत आहे.

### हप्ता चुकला की दंड

मायक्रो फायनान्सकडून घेतलेल्या कर्जाचा हप्ता चुकविता येणार नाही, असा दंडक आहे. ग्रुपमधील एखाद्या महिलेने कर्जाचा हप्ता चुकवला तर ग्रुपमधील इतर सर्व महिलांनी मिळून त्या महिलेचा कर्जाचा हप्ता भरावा लागतो. अशावेळी ज्या महिलेने हप्ता भरला नाही. त्या महिलेस नाहक आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो.

# वडील, पती हयात नसलेल्या 'लाडक्या बहिणीं' संभ्रमावस्थेत



## ई केवायसी बंधनकारक; शासनाकडून कोणताही पर्यायच उपलब्ध नाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेतील लाभार्थ्यांसाठी ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक केली आहे. योजनेत पारदर्शकता आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. आधारकार्ड बंधनकारक असल्याने ज्या महिलांचे वडिल, पती हयात नाहीत तसेच घटस्फोटित महिलांची अडचण झाली आहे. या महिलांबाबत शासनाकडुन याबाबत कुठलाही निर्णय झाला नसल्याने त्यांच्यात संभ्रमावस्था आहे. एकाच कुटुंबात दोनपेक्षा जास्त लाभार्थी तसेच २१ वर्षांपेक्षा कमी व ६५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या अर्जाची पडताळणी करण्याचे काम सुरू आहे. ई-केवायसी प्रक्रियेत लाभार्थी महिलेला स्वतःच्या आधार क्रमांकासोबतच पती किंवा वडिलांचा आधार क्रमांक देणे अनिवार्य आहे. या आधार क्रमांकांच्या माध्यमातून कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न तपासले जाणार आहे. पती किंवा वडील हयात नसलेल्या किंवा घटस्फोटित महिलांची खूप मोठी अडचण झाली आहे. कुटुंबातील सदस्य किंवा सासरकडील सदस्याचा आधार क्रमांक वापरण्याचा पर्याय उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे. योजनेतील अपात्र महिलांना वगळण्यासाठी आणि गरजू महिलांनाच नियमितपणे लाभ मिळावा, यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. ई-केवायसी न करणाऱ्या महिलांना पुढील हप्ता मिळण्यात अडचण येऊ शकते.

**१८ की ३० नोव्हेंबरपर्यंत अंतीम मुदत; संभ्रम कायम**

राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी योजनेंतर्गत सर्व पात्र महिलांना ई- केवायसी करणे बंधनकारक केले आहे. शासनाने यासाठी ३० नोव्हेंबर ही अंतीम तारीख निश्चित केली होती. तसेच सदर प्रक्रिया जलद पूर्ण करण्याचे निर्देशही दिले होते. मात्र, या पार्श्वभूमीवर बुधवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीनंतर मंत्री अदिती तटकरे यांनी १८ नोव्हेंबरपर्यंत ई- केवायसी प्रक्रिया सुरु राहील असे सांगितले. त्यामुळे अंतीम तारीख १८ की ३० नोव्हेंबर याबाबत संभ्रम कायम आहे.

**घरबसल्या करता येणार ई- केवायसी**

गुगल क्रोमवर माझी लाडकी बहीण ई- केवायसी शोधल्यास https://ladakibahinyojana.co.in/ekyc या संकेतस्थळावर थेट सुविधा उपलब्ध आहे. यात स्वतः आणि पतीचा अथवा वडिलांचा आधार क्रमांक टाकून घरबसल्या ई- केवायसी करता येईल.

# 'साहेब नाहीत' म्हणत पोलिसांनी गुरे चोरीची फिर्याद नोंदविण्यास नकार

## मारवड पोलीस ठाण्यातील प्रकार; पशुपालकांमध्ये संताप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील सबगव्हाण येथे दि. २८ रोजी रात्रीच्या सुमारास दोन शेतकऱ्यांची गुरे चोरीस गेली. याबाबत गुरे मालक जगन्नाथ ओंकार पाटील व दिनेश मका पाटील दुसऱ्या दिवशी अर्थात दि. २९ रोजी दुपारी दीड ते दोन वाजण्याच्या सुमारास तालुक्यातील मारवड पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवण्यासाठी गेले. मात्र, तेथील पोलिस कर्मचाऱ्यांनी "साहेब नाहीत, असे सांगून तक्रार नोंदवण्यास नकार दिला.

नैसर्गिक आपत्तीमुळे आधीच खचलेल्या शेतकऱ्यांवर या गुरे चोरीच्या घटनेने आणखी संकट ओढवले आहे. पशुधन हे शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असते .गुरे चोरीच्या घटनांमुळे त्यांचे मोठे नुकसान होत आहे.

या घटनेमुळे परिसरातील शेतकरी वर्गात संतापाचे वातावरण आहे. पोलिसांनी अशा तक्रारींवर तत्काळ आणि संवेदनशीलतेने कार्यवाही करणे आवश्यक असल्याची भावना शेतकरी वर्गातून व्यक्त होत आहे. स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, पोलिसांनी अशा घटनांकडे गंभीरतेने पाहून शेतकऱ्यांचा विश्वास परत मिळवणे गरजेचे आहे.

" याबाबत मला नुकतीच माहिती मिळाली आहे. तसेच त्या दिवशी पोलीस ठाण्यात काय प्रकार घडला त्याबाबत शेतकरी व पोलीस कर्मचारी या दोघांना सोक्षमोक्ष बोलवून चर्चा केली जाईल. नेमकी काय घटना घडली आहे, त्याची माहिती घेऊन गुन्हा दाखल केला जाईल.

– **जिभाऊ पाटील,**
सहाय्यक पोलीस निरीक्षक, मारवड



# ताडेपुरा परिसरातून तरुण बेपत्ता

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सीम कार्ड घेऊन येतो असे सांगून शहरातील ताडेपुरा भागातील मंगल नगर येथून एक तरुण बेपत्ता झाला आहे. ही घटना गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी दुपारी घडली. याबाबत त्याच्या भावाने दिलेल्या माहितीवरून अमळनेर पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद झाली आहे.

पोलिसांनी सांगितले, की विजय कैलास धनगर (वय २३) हा तरुण घरी सीम कार्ड घेऊन येतो असे सांगून निघाला होता. त्याच्या भावाने त्यास सायंकाळी पाचच्या सुमारास फोनवर संपर्क साधला, असता थोड्या वेळात येतो, असे त्याने सांगितले. मात्र, तो घरी परतला नाही. त्यानंतर पुन्हा त्याला कॉल केला असता त्याचा फोन स्वीच ऑफ येत होता. त्यानंतर त्याचा शोध घेतला असता तो सापडला नाही. याप्रकरणी पोलिसांत हरवल्याची नोंद झाली आहे.



# ट्रेन नव्हे, रुळांवरचे ५ स्टार हॉटेल!

## भारताची सर्वांत महागडी ट्रेन; तिकिटाची किंमत ऐकाल तर हादरून जाल

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतीय रेल्वेने दररोज सुमारे अडीच कोटी लोकांचा प्रवास सुलभ करतो. वंदे भारत सारख्या आलिशान ट्रेन सामील झाल्या असल्या, तरी त्याहूनही भव्य ट्रेन *आयआरसीटीसीच्या मदतीने चालवली जाते. ही ट्रेन रुळांवरचे जणू चालते महालच आहे.

**‘ दि महाराजास् एक्स्प्रेस ’:**

भारताची सर्वांत महागडी ट्रेन भारतीय रेल्वेत आरामदायी प्रवास म्हणजे आधी राजधानी एक्स्प्रेस, नंतर तेजस आणि वंदे भारत एक्स्प्रेस डोळ्यांसमोर यायची. पण आता एक ट्रेन आहे. जिला चालते फाईव्ह स्टार हॉटेल म्हटले जाते. तिचे तिकीट लाखो रुपयांचे असते. या ट्रेनमधून मुख्यतः परदेशी पर्यटक प्रवास करतात आणि शाही थाटात भारताचा इतिहास अनुभवतात. राजा-महाराजांसारख्या सुविधा असलेल्या या ट्रेनबद्दल जाणून घेऊया.

‘ दि महाराजास् एक्स्प्रेस ’ ही भारताची सर्वांत महागडी टुरिस्ट ट्रेन आहे. ही ट्रेन भारतातील सर्वांत सुंदर आणि ऐतिहासिक पर्यटनस्थळांची सफर घडवते. हा प्रवास सामान्य रेल्वे प्रवासासारखा नाही, तर पूर्ण शाही अनुभव आहे.

**एवढे तिकीट महाग का?**

या ट्रेनचे तिकीट २० लाख रुपयांपर्यंत असते. इतके महागडे तिकीट असल्याने सुविधाही तशाच उच्च दर्जाच्या आहेत. ट्रेन आतून इतकी भव्य आहे की तुम्हाला वाटेल, राजमहालात बसलात! प्रत्येक कोच शानदार पद्धतीने सजवलेला असतो. प्रवाशांना चार लक्झरी श्रेणीमध्ये प्रवास करता येतो.

१) डिलक्स केबिन
२) ज्युनिअर स्यूट
३) स्यूट
४) प्रेसिडेंशियल स्यूट (सर्वांत आलिशान)

**संपूर्ण पॅकेजचा खर्च**

तिकिटात फक्त ट्रेनचा प्रवास नाही, तर पूर्ण पॅकेजचा समावेश आहे.
फाईव्ह स्टार दर्जाचे जेवण
अल्कोहोल ड्रिंक्सची सुविधा
फिरण्याच्या ठिकाणी लक्झरी हॉटेलमध्ये मुक्काम
बस आणि ट्रॅव्हलचा संपूर्ण खर्च

**शाही सफरचा मार्ग**

‘ दि महाराजास् एक्स्प्रेस ’ सामान्यतः ७ दिवस आणि ६ रात्रीचा प्रवास करते. यात सुमारे २,७०० किलोमीटरचा प्रवास असतो. ही ट्रेन मुख्यतः भारताच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक भागात धावते. मार्गात राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशातील खास पर्यटनस्थळे येतात.

**ताजमहल (जगातील सात आश्चर्यांपैकी एक)**

जयपूर आणि उदयपूरचे शानदार किल्ले-महाल
रणथंबोर नॅशनल पार्क घनदाट जंगलात वाघ पाहण्याचा थरार ही ट्रेन केवळ प्रवास नाही, तर भारताच्या शाही वारशाची जिवंत सफर आहे.












# स्वयंपाक आणि तळण्यासाठी उत्तम तेल कोणते? तज्ज्ञ काय सांगतात?



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सणासुदीच्या काळात करंजी, चकली, शंकरपाळे, पुऱ्या, कचोऱ्या यांसारखे तेलकट पदार्थ जास्त खाल्ले जातात. मात्र, चुकीच्या तेलाचा वापर आरोग्यावर विपरीत परिणाम करू शकतो. तज्ज्ञांच्या मते, योग्य तेल निवडल्यास अन्न चविष्ट आणि निरोगी राहते. तसेच हृदयाचे स्वास्थ्य राखले जाते आणि वजन वाढण्यासही प्रतिबंध होतो. प्रसिद्ध अमेरिकन गॅस्ट्रोएन्टोरोलॉजिस्ट डॉ. सौरभ सेठी यांच्या मते, योग्य तेलामुळे तेलकट अन्न नुकसान करण्याऐवजी आरोग्य सुधारते आणि तंदुरुस्त ठेवते. स्वयंपाक आणि तळण्यासाठी कोणते तेल उत्तम आहे, याबाबत तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले आहे.

**स्वयंपाक आणि तळण्यासाठी उत्तम तेल**

**१) नारळ तेल** : नारळ तेलाचा वापर भारतीय स्वयंपाकघरात वर्षानुवर्षे होत आहे. हे तेल कमी तेलकट असते. अन्न लवकर खराब होत नाही. शरीराला ऊर्जा प्रदान करते. त्याचा धूरबिंदू (स्मोक पॉइंट) ३५० एफ (१७७ सी) असल्याने ते मध्यम तापमानावर स्वयंपाकासाठी योग्य आहे.

**२) शेंगदाणा तेल**

शेंगदाणा तेलात अनेक पोषक घटक असतात. जे आरोग्यासाठी फायदेशीर आहेत. यात शिजवलेले अन्न चविष्ट आणि टिकाऊ राहते. त्याचा धूरबिंदू ४५० एफ (२३२ सी) असल्याने ते तळण्यासाठी उत्तम आहे.

**३) तूप** : तूप भारतीय स्वयंपाकघरातील पारंपरिक घटक आहे. याचा धूरबिंदू ४५० एफ (२३२ सी) असल्याने ते तळण्यासाठी आणि स्वयंपाकासाठी आदर्श आहे. तूप महाग असले तरी ते घरच्या घरी तयार करता येते. यात शिजवलेले पदार्थ चविष्ट आणि पौष्टिक राहतात.

**४) ॲवोकॅडो तेल** : ॲवोकॅडो तेल तळण्यासाठी अत्यंत उत्तम मानले जाते. याचा धूरबिंदू ५२० एफ (२७१ सी) असल्याने उच्च तापमानावर तळण्यासाठी ते योग्य आहे. यात शिजवलेले पदार्थ मऊ राहतात. त्याला आकर्षक सुगंध मिळतो.

**तज्ज्ञांचे मत :** डॉ. सौरभ सेठी यांच्या मते, तेलाचा धूरबिंदू आणि पोषकता यांचा विचार करून तेल निवडावे. मोहरीचे तेल आणि रिफाईंड तेलाचा अतिवापर टाळावा. कारण यामुळे आरोग्यावर दीर्घकालीन विपरीत परिणाम होऊ शकतात. नारळ, शेंगदाणा, तूप आणि ॲवोकॅडो तेल यांसारखी तेल वापरल्यास अन्न चविष्ट, पौष्टिक आणि आरोग्यदायी राहते.

**सावधानता :** तेलाचा पुन्हा वापर टाळा : वारंवार तळण्यासाठी तेलाचा वापर केल्यास त्याचे रासायनिक गुणधर्म बदलतात. जे आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकते. प्रमाणात वापर : तेलकट पदार्थांचे सेवन मर्यादित ठेवा. जेणेकरून वजन वाढण्याचा धोका कमी होईल.

# दिवाळीचा फराळ तळल्यानंतर उरलेले तेल पुन्हा वापरावे का?

## तज्ज्ञ काय सांगतात?

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

दिवाळीच्या सणात फराळ बनवताना मोठ्या प्रमाणात तेल वापरले जाते. फराळ तळल्यानंतर उरलेल्या तेलाचे (Reuse of Cooking Oil) काय करावे, हा प्रश्न अनेकांना पडतो. काही जण हे तेल पुन्हा भाजी-आमटीसाठी वापरतात, तर काही जण त्यात पुन्हा तळणी करतात. काही जण ते फेकून देतात. पण याबाबत तज्ज्ञ काय सांगतात?

**FSSAI च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार**

- एकदा वापरलेले तेल शक्यतो खाण्यासाठी पुन्हा वापरू नये.
- जर पुन्हा वापरणे आवश्यक असेल, तर तेल जास्तीत जास्त तीन वेळा वापरावे. परंतु प्रत्येकवेळी त्याची गुणवत्ता तपासावी.
- तेल पुन्हा गरम केल्यास त्याचे रासायनिक गुणधर्म बदलतात. ज्यामुळे ट्रान्स फॅट्स आणि फ्री रॅडिकल्ससारखी विषारी संयुगे तयार होतात. ही संयुगे आरोग्यासाठी हानिकारक असतात.

**तज्ज्ञांचे मत**

- वारंवार वापरलेल्या तेलामुळे यकृताचे विकार, उच्च रक्तदाब, हृदयविकार आणि कर्करोगाचा धोका वाढू शकतो.
- तेल जास्त काळ गरम केल्याने त्यात पॉलिसायक्लिक ॲरोमॅटिक हायड्रोकार्बन्स (PAHs) आणि ऑक्सिडाइज्ड फॅट्स तयार होतात. जे दीर्घकालीन आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरतात.

**उरलेल्या तेलाबाबत काय करावे?**

**१) टाळा :** शक्य असल्यास उरलेले तेल खाण्यासाठी पुन्हा वापरणे टाळावे.

**२) मर्यादित वापर :** जर पुन्हा वापरणे आवश्यक असेल, तर तेल स्वच्छ गाळून, त्याचा रंग आणि वास तपासूनच वापरावे. तीनपेक्षा जास्त वेळा वापरू नये.

**३) पर्यायी वापर :** उरलेले तेल खाण्यासाठी वापरण्याऐवजी, दिवे लावणे, साबण बनवणे किंवा इतर घरगुती कामांसाठी वापरता येऊ शकते.

**४) सुरक्षित विल्हेवाट :** तेल थंड करून बाटलीत भरून स्थानिक पुनर्वापर केंद्रात द्यावे किंवा कचऱ्यात फेकण्यापूर्वी कागदात गुंडाळावे.दिवाळीच्या फराळासाठी वापरलेले तेल पुन्हा वापरणे आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. शक्यतो नवीन तेल वापरा आणि उरलेल्या तेलाची योग्य विल्हेवाट लावा. तुमच्या आणि कुटुंबाच्या आरोग्याची काळजी घ्या.

# दुनिया में कितने देशों में खेला जाता है क्रिकेट?

## जानें आयसीसी की मान्यता और श्रेणियां



ग्लोबल महातेज वृत्तसेवा

क्रिकेट, जो इंग्लैंड में जन्मा, आज विश्व स्तर पर लोकप्रिय खेल है। भारत सहित कई देशों में इसे उत्साह के साथ खेला और देखा जाता है। लेकिन क्या आप जानते हैं कि दुनिया में कितने देश क्रिकेट खेलते हैं और अंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद ने कितने देशों को मान्यता दी है?

**११० देशों को आयसीसी की मान्यता**

आयसीसी ने ११० देशों को क्रिकेट खे लने की मान्यता दी है। ये देश तीन श्रेणियों में विभाजित हैं, जो उनकी अंतरराष्ट्रीय स्तर पर खेलने की योग्यता तय करती हैं।

**१) पूर्ण सदस्य :**

पूर्ण सदस्य वे देश हैं, जिन्हें टेस्ट, वनडे और टी-२०, यानी क्रिकेट के सभी प्रारूप खेलने का अधिकार है। वर्तमान में ऐसे १२ देश हैं-

- अफगानिस्तान, ऑस्ट्रेलिया, बांग्लादेश, इंग्लैंड, भारत, आयरलैंड, न्यूजीलैंड, पाकिस्तान, दक्षिण अफ्रीका, श्रीलंका, वेस्टइंडीज और जिम्बाब्वे।

**2) एसोसिएट सदस्य**

एसोसिएट सदस्य वे देश हैं, जहां क्रिकेट अच्छी तरह स्थापित और संगठित है, लेकिन उन्हें पूर्ण सदस्यता नहीं मिली। इन देशों की संख्या ९८ है। ये देश मुख्य रूप से वनडे और टी-२० प्रारूप खेलते हैं।

**३) एफिलिएट सदस्य**

पहले यह तीसरी श्रेणी थी, लेकिन २०१७ में आयसीसी ने इसे समाप्त कर सभी एफिलिएट सदस्यों को एसोसिएट सदस्यों में शामिल कर लिया।

**नोबेल पुरस्कार की राशि**

लेख में पूछे गए नोबेल पुरस्कार के प्रश्न का उत्तर देते हुए २०२५ में नोबेल पुरस्कार विजेता को लगभग ११ मिलियन स्वीडिश क्रोना (की राशि मिलती है, जो भारतीय रुपये में करीब ८.७ करोड़ रुपये है। यह राशि विभिन्न श्रेणियों (भौतिकी, रसायन, चिकित्सा, साहित्य, शांति और अर्थशास्त्र) के विजेताओं को दी जाती है।

# तरुणाचे भन्नाट जुगाड :

## २ वर्षे एकही रुपया न देता फूड डिलिव्हरी कंपनीकडून फ्री जेवण; ट्रीक पाहून पोलीसही हादरले

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

जपानमध्ये ३८ वर्षीय तरुणाला फूड डिलिव्हरी कंपनीची २१ लाख रुपयांची फसवणूक केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. त्याने २ वर्षांत १,०९५ वेळा जेवण ऑर्डर केले. पण एकही रुपया दिला नाही.

**कशी केली फसवणूक?**

जपान टाइम्सच्या रिपोर्टनुसार आईची प्रांतातील नागोया पोलिसांनी या तरुणाला अटक केली. तो कंपनीच्या ॲपमधील त्रुटींचा फायदा घेऊन फ्री जेवण मिळवत होता.

**मुख्य ट्रीक :** कॉन्टॅक्टलेस डिलिव्हरी + रिफंड

१) ऑर्डर द्या, कॉन्टॅक्टलेस डिलिव्हरी निवडा.
२) जेवण डिलिव्हर झाल्यावर ॲपवर रिफंडसाठी तक्रार दाखल करा.

**कारण :** ‘ पार्सल मिळालेच नाही’

३) कंपनी रिफंड देते, जेवण + पैसे दोन्ही मिळतात.

**नवीन जुगाड :** बनावट अकाउंट्स

३ जुलैपासून त्याने १२४ बनावट अकाउंट्स तयार केले.

**उदाहरण : आईस्क्रीम ऑर्डर, डिलिव्हरी घेतली, ‘ मिळाले नाही ’ अशी तक्रार, १६,००० येन (१०५ डॉलर) रिफंड मिळाला.**

(टीप : ही घटना जपानमधील आहे. भारतात अशा फसवणुकीस कायदेशीर शिक्षा होऊ शकते. कायद्याचे पालन करा.)

# तिसऱ्या प्रयत्नात आयएएस बनल्या अर्चना कुमारी




**सक्सेस स्टोरी...**

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

बिहारच्या नवादा जिल्ह्यातील अर्चना कुमारी यांनी महागड्या कोचिंगशिवाय स्व-अभ्यासाच्या जोरावर यूपीएससी २०२० परीक्षेत ११० वी रँक मिळवून आयएएस अधिकारी बनण्याचे स्वप्न साकार केले. याशिवाय त्यांनी भारतीय आर्थिक सेवा (आयईएस) आणि बिहार लोकसेवा आयोग (बीपीएससी) परीक्षांमध्येही यश मिळविले.

**प्रारंभिक जीवन आणि शिक्षण**

अर्चना यांचे वडील राजेंद्र प्रसाद हे मुख्याध्यापक आहेत. त्यांच्या आईचे निधन झाले आहे. लहानपणापासून अभ्यासात हुशार असलेल्या अर्चनांनी बिहारमधून प्राथमिक शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर दिल्लीतील लेडी श्री राम कॉलेजमधून अर्थशास्त्रात पदवी आणि जवाहरलाल नेहरू विद्यापीठातून (जेएनयू) अर्थशास्त्रात पदव्युत्तर पदवी मिळविली.

**यूपीएससीचा प्रवास**

पदव्युत्तर शिक्षणानंतर अर्चनांनी यूपीएससी नागरी सेवा परीक्षेची तयारी सुरू केली. महागड्या कोचिंग क्लासेसला नकार देत त्यांनी स्व-अभ्यासावर भर दिला. पहिल्या दोन प्रयत्नांमध्ये अपयश आले.

परंतु त्यांनी जिद्द आणि आत्मविश्वास कायम ठेवला. या काळात त्यांनी २०१९ मध्ये भारतीय आर्थिक सेवा आणि बिहार लोकसेवा आयोग परीक्षा उत्तीर्ण केली, ज्यात त्यांना बीपीएससीमध्ये सहावे स्थान मिळाले. अखेर तिसऱ्या प्रयत्नात त्यांनी यूपीएससी २०२० मध्ये ११० वी रँक मिळवत आयएएस अधिकारी होण्याचा मान मिळवला.

**वैयक्तिक जीवन**

यूपीएससी २०२० मध्येच ३४ वी रँक मिळवणाऱ्या मध्य प्रदेशातील भारतीय वन सेवा (आयएफएस) अधिकारी विवेक सिंह यांच्याशी अर्चनांनी लग्न केले. सध्या त्या मध्य प्रदेश केडरच्या आयएएस अधिकारी असून, कृषी मंत्रालयात सहाय्यक संचालक म्हणून कार्यरत आहेत.

**अर्चना कुमारी यांची कहाणी कठोर** परिश्रम, समर्पण आणि योग्य दिशेने केलेल्या प्रयत्नांचे प्रतीक आहे. स्व-अभ्यास आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी अपयशाला यशात बदलले, जी यूपीएससी उमेदवारांसाठी मोठी प्रेरणा आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# शेतरस्ता आदेशाची सात दिवसांत अंमलबजावणी बंधनकारक!

## महसूल मंत्री बावनकुळेंचे आदेश ; स्थळ पाहणी, पंचनामा आणि जिओ टॅग फोटो अनिवार्य

**ग्लोबल महातेज अमळनेर**

**योगेश महाजन**

शेतरस्ते आणि वहिवाटीच्या रस्त्यांच्या वादासंदर्भात तहसीलदारांनी दिलेल्या आदेशाची सात दिवसात प्रत्यक्ष अंमलबजावणी सक्तीची करण्यात आली आहे. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना याबाबत निर्देश दिले आहेत. स्थळ पाहणी, पंचनामा आणि जिओ- टॅग फोटो काढणेही अनिवार्य केले आहे. मात्र, अमळनेर तालुक्यात कुठलेही आदेश अद्याप दिलेले नाहीत, अशा तक्रारी अनेक शेतकऱ्यांनी केल्या आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार " नागरिकांचे जीवनमान सुकर करणे " या विषयासाठी अभ्यास समिती नेमण्यात आली होती. या समितीने नोंदवलेल्या निरिक्षणात अनेक प्रकरणांमध्ये वहिवाटीचा रस्ता मोकळा करणे अथवा सरबांधावरून रस्ता देण्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाचे पालन होत नसल्याचे मत नोंदवले होते. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्री बावनकुळे यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांसाठी सविस्तर दिशानिर्देश जारी केले आहेत. मामलेदार न्यायालय अधिनियम किंवा महाराष्ट्र जमीन महसूल साहिंतेतर्गत हा निर्णय अधिकाऱ्यांना बंधनकारक केला आहे. यामुळे यापुढे सात दिवसांत प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी. स्थळ पाहणी करुन पंचनामा आणि जिओ टॅग फोटोंच्या आधारे करण्याचे आदेश अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.



**काय आहेत नवीन आदेश?**

मामलेदार न्यायालय अधिनियम, १९०६ (कलम ५) किंवा महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (कलम १४३) अन्वये दिलेल्या आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी. तोपर्यंत संबंधित प्रकरण दप्तरी दाखल (बंद) करण्यात येऊ नये, असा स्पष्ट आदेश देण्यात आला आहे. अधिकाऱ्याने अंतिम आदेश पारित केल्यानंतर, पुढील सात दिवसाच्या आत त्या आदेशाची अंमलबजावणी झाली आहे कींवा नाही ? याची खातरजमा करणे बंधनकारक आहे. ही खात्री केवळ तोंडी न करता स्थळपाहणी पंचनामा करणे व जागेची जिओ-टॅग छायाचित्रांच्या आधारावर करावी. हा पंचनामा आणि जिओ-टॅग फोटो संबंधित प्रकरणाच्या मूळ संचिकेमध्ये समाविष्ट करणे अनिवार्य असेल.

**अधिकारी, कर्मचाऱ्यांना तत्काळ सूचना द्याव्यात**

या निर्देशांमुळे केवळ 'कागदी' आदेश देऊन अधिकाऱ्यांची जबाबदारी संपणार नाही. निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांनी आपापल्या अखत्यारीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना तात्काळ सूचना द्याव्यात. अंमलबजावणीची वेळोवेळी खातरजमा करणे आवश्यक आहे. यामुळे वर्षानुवर्षे रस्त्याच्या वादात अडकलेल्या हजारो नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

### अमळनेर तालुक्यात आदेश व्हावेत

अमळनेर तालुक्यात शेताच्या बांधावरून वहिवाटीवरुन अनेक शेतकऱ्यांचे वाद वर्षानुवर्षे प्रलंबित आहेत. मात्र, शासनाने घेतलेल्या या निर्णयाची अंमलबजावणी तालुक्यात अद्याप सुरु झालेली नाही. काही शेतकऱ्यांनी याबाबत तहसीलदारांची भेटही घेतली आहे. तहसीलदारांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आदेश द्यावेत, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# महाराष्ट्राच्या मातीत सोन्याचा खजिना? कोकण, विदर्भातील संभाव्य सोन्याच्या खाणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोने हा जगातील सर्वांत मौल्यवान धातू मानला जातो. सध्या जागतिक बाजारात सोन्याच्या दरात वाढ होत असल्याने त्याची मागणी वाढली आहे. भारतात मध्य प्रदेश, कर्नाटक, झारखंडसारख्या राज्यांमध्ये सोन्याच्या खाणी कार्यरत आहेत. परंतु भारतातील सर्वांत मोठी सुवर्णपेठ असलेल्या महाराष्ट्रात अद्याप एकही सक्रिय सोन्याची खाण नाही. तरीही राज्याच्या भूगर्भात सोन्यासह विविध मौल्यवान खनिजांचा मुबलक साठा दडलेला असल्याचे अलीकडील अहवालांमधून समोर आले आहे. हा खजिना बाहेर काढला गेल्यास महाराष्ट्राच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल.



**कोकण आणि विदर्भ : निसर्गाची कृपा**

महाराष्ट्राचे कोकण आणि विदर्भ हे दोन भूभाग निसर्गाने आशीर्वादीत आहेत. काही दिवसांपूर्वी केंद्र सरकारच्या खनिज विभागाने या भागांमध्ये सोन्याच्या साठ्याची शक्यता नमूद केली होती. यानुसार कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात बागवाडी आणि घानपेवाडी या भागांत सोन्याचे साठे आढळले. विदर्भातील चंद्रपूर जिल्ह्यात मिंझरी आणि बामणी या भागांत दोन सोन्याचे ब्लॉक सापडले. केंद्र सरकारने या दोन सोन्याच्या खाणींची ओळख पटवली असल्याचे महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनीही स्पष्ट केले आहे.

चंद्रपूर हे विदर्भातील खनिज संपत्तीची राजधानी मानले जाते. येथे मोठ्या प्रमाणात कोळशाच्या खाणी आहेत. शिवाय तांबे, प्लॅटिनम, दुर्मीळ रेथेनियम, रेडियम आणि इरिडियमसारखे मौल्यवान धातूही भूगर्भात दडलेले आहेत.

सोन्यासह तांब्याचेही मोठे साठे येथे आहेत. राज्याच्या खनिज विभागाने केंद्राच्या अहवालानुसार चाचण्या सुरू केल्या आहेत. दुसरीकडे सिंधुदुर्गातही सोन्याच्या साठ्याची शक्यता तपासण्यासाठी सर्वेक्षण सुरू आहे.

**शास्त्रीय पुरावे : जीएसआयचे सर्वेक्षण**

भूवैज्ञानिक सर्वेक्षण ऑफ इंडियाने (जीएसआय) महाराष्ट्राच्या भूगर्भाचे सखोल सर्वेक्षण केले आहे. निकषांनुसार पूर्व विदर्भातील सर्वेक्षण हे जी ४ स्तरावरील (प्राथमिक पातळीचे) होते. ज्यात सोन्याचा साठा असल्याचे स्पष्ट झाले. पण त्याचे प्रमाण निश्चित नाही. ठोस निष्कर्षासाठी जी ३ किंवा जी २ स्तरावरील अधिक सखोल सर्वेक्षण आवश्यक आहे, असे भूवैज्ञानिकांचे मत आहे.

इतिहासाकडे वळता १९८४-८५ मध्ये जीएसआयने नागपूर जिल्ह्यातील भिवापूर तालुक्यातील पुल्लर, परसोरी, थूतानबोरी भागांचे सर्वेक्षण केले होते. यात सोन्याचे साठे आढळले. तसेच गडचिरोली जिल्ह्यातील घनदाट जंगल आणि डोंगराळ भागातही सोन्याचा साठा असल्याचे उघड झाले. २०१३ मध्ये जीएसआयने भिवापूर-कुही पट्ट्यात ११४ टन सोन्याचा साठा असू शकतो, असा अंदाज वर्तविला होता. साकोली गटातील या भागांत सल्फाइडसह बांधलेले सोन्याचे खनिज आढळले आहेत. सध्या डेक्कन गोल्ड मायन्स लिमिटेडसारख्या कंपन्या या भागांत शोधकार्य करत आहेत. ज्यामुळे महाराष्ट्रातील सोने उत्पादन वाढण्याची शक्यता आहे. महाराष्ट्रात सध्या कोळसा, बॉक्साइट, लोहखनिजासह सोन्यासारखी खनिजे आहेत. मात्र सोन्याच्या सक्रिय खाणी नाहीत. हा खजिना शोधून बाहेर काढण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत.

# वाळू वाहतुकीवरून एकास मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तालुक्यातील मांडळ येथे वाळूच्या वादातून चौघांनी एका तरुणाला बेदममारहाण केली. याप्रकरणी गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी चौघांविरुद्ध मारवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.



सोनू संजय कोळी (वय २६) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सुमारे सात वाजता मांडळ येथील महादेव मंदिराजवळ फोनवर तो बोलत होता. यावेळी वाळू वाहतूक करताना झालेल्या जुन्या वादातून योगेश हिलाल कोळी, सूरज राजेंद्र कोळी, समाधान भास्कर पाटील आणि अक्षय राजेंद्र कोळी यांनी त्यास लाकडी दांडक्याने बेदम मारहाण केली. सोनू कोळी यांच्या भावाने त्यास रुग्णालयात धुळे येथे उपचारासाठी दाखल केले होते. तेथून परतल्यावर सोनू कोळी यांनी गुन्हा दाखल केला आहे. हवालदार दिनेश पाटील तपास करीत आहेत.

### बागपतमध्ये सापडले महाभारतकालीन अवशेष

पांडवांनी युद्ध टाळण्यासाठी कौरवांकडे केवळ पाच गावे मागितली होती. त्यामध्ये इंद्रप्रस्थ (सध्याच्या दिल्लीचा परिसर), पाणीप्रस्थ (सध्याचे पानिपत), सोणप्रस्थ (सध्याचे सोनपत), तिळप्रस्थ (सध्याचे तिलपत) आणि व्याघ्रप्रस्थ (सध्याचे बागपत) यांचा समावेश होता. उत्तर प्रदेशातील याच बागपत जिल्ह्यातील सिसाना गावात इतिहासाच्या पानांना उजाळा देणारा एक महत्त्वपूर्ण शोध लागला आहे. खंडवारी वनक्षेत्रात खोदकाम करताना महाभारताच्या काळातील अवशेष आणि कलाकृती सापडल्या आहेत. या दुर्मिळ शोधामुळे इतिहासकार आणि पुरातत्त्वशास्त्रज्ञांमध्ये मोठा उत्साह संचारला आहे.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

**बातमीसाठी संपर्क :**
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

**जाहिरातीसाठी संपर्क :**
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234

# चष्म्याचा नंबर वाढू नये म्हणून 'या' ३ गोष्टी आवर्जून करा...

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**पॉवर ऑफ आइज :** जर तुम्हाला चष्मा घालायचा नसेल किंवा तुमची दृष्टी आणखी खराब होऊ नये, असे वाटत असेल, तर तुमच्या दिनचर्येत काही बदल करणे अत्यंत आवश्यक आहे.

सध्या दृष्टी कमकुवत होणे ही एक सामान्य समस्या बनली आहे. पूर्वी विशिष्ट वयानंतर चष्मा वापरणे स्वाभाविक मानले जायचे. पण आता २-३ वर्षांच्या मुलांनाही चष्मा लावण्याचा सल्ला दिला जातो. याला कारणीभूत आहेत खाण्या-पिण्याच्या चुकीच्या सवयी आणि वाढलेला स्क्रीन टाइम. म्हणूनच डोळ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. योगतज्ज्ञांनी सांगितलेले काही सोपे उपाय जाणून घेऊया...

**चष्म्याचा नंबर कसा वाढतो?**

चष्मा घातल्यानंतरही नंबर वाढत राहतो. कारण-आनुवांशिकता पुस्तक वाचणे, डिजिटल स्क्रीनचा जास्त वापर डोळ्यांवर दीर्घकाळ ताण पडल्याने स्नायू कमकुवत होतात.

**बुबुळाचा आकार बदलतो**

हे सर्व घटक चष्म्याचा नंबर वाढवितात.

**चष्म्याचा नंबर वाढू नये म्हणून 'या' ३ गोष्टी आवर्जून करा**

योगतज्ज्ञ सांगतात, की चष्मा टाळायचा असेल किंवा दृष्टीत सुधारणा हवी असेल, तर या तीन गोष्टी रोज करा.

१) नैसर्गिक प्रकाशात जास्त वेळ घालवा अंधारात किंवा मंद प्रकाशात काम करणे टाळा. यामुळे डोळ्यांवर अनावश्यक ताण येतो.

२) स्क्रीनपासून ठराविक अंतर ठेवा लॅपटॉप/फोन वापरताना वारंवार ब्रेक घ्या. डोळ्यांजवळ येऊ देऊ नका. २०-२०-२० नियम पाळा : दर २० मिनिटांनी २० सेकंद २० फूट दूर पाहा.

३) डोळ्यांचे नियमित व्यायाम करा हे व्यायाम डोळ्यांच्या स्नायूंना मजबूत करतात आणि दृष्टी सुधारतात.




**डोळ्यांसाठी सोपे व्यायाम (रोज करा)**

योगतज्ज्ञांनी सांगितलेले हे व्यायाम नियमित करा.

**१) पेन्सिल पंपिंग :** एका पेन्सिलच्या टोकाकडे पाहत राहा. हळूहळू पेन्सिलजवळ आणा, नंतर दूर नेहा. असे ५० वेळा करा.

**२) आठचा आकार फिरविणे :** झोपण्यापूर्वी डोळे बंद करून आठच्या आकारात डोळे फिरवा. दोन्ही दिशेने १०-१० वेळा करा.

**तापणी :** दोन्ही हात एकमेकांवर घासून गरम करा. डोळ्यांवर हलकेच ठेवा (प्रकाश येणार नाही याची काळजी घ्या). १-३ मिनिटे शांत राहा. हे डोळ्यांना आराम* देते आणि ताण कमी करते.

**(टीप : ही माहिती योगतज्ज्ञ आणि डोळ्यांच्या तज्ज्ञांच्या सल्ल्यावर आधारित आहे. पण कोणताही उपाय सुरू करण्यापूर्वी डोळ्यांच्या डॉक्टरांचा सल्ला घेणे उत्तम.**

# प्रशासनाने नुकसानीचे सरसकट पंचनामे करावेत

## कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांचे आमदार अनिलदादा पाटील यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सततच्या अवकाळी पावसाने अमळनेर विधानसभा मतदारसंघातील खरीप हंगाम वाया गेला आहे. या पार्श्वभूमीवर माजी आमदार कृषिभूषण साहेबराव पाटील यांनी आमदार अनिलदादा पाटील यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले, आहे की केंद्र शासनाने विहित केलेल्या १२ नैसर्गिक आपत्ती व्यतिरिक्त राज्य शासनाने शासन निर्णय दि. ३० जानेवारी २०१४ अन्वये घोषित अवेळी पाऊस, शासन निर्णय २२ जून २०२३ अन्वये घोषित सततचा अवेळी पाऊस ही नैसर्गिक आपत्ती घोषित केली आहे. त्यानुसार अमळनेर विधानसभा मतदारसंघात ऑक्टोबर २०२५ मध्ये सतत सात ते आठ दिवसापासून झालेल्या अवकाळी पावसामुळे संपूर्ण खरीप हंगाम वाया गेला आहे. याबाबत स्थानिक प्रशासनाने पीक नुकसानीचे सरसकट पंचनामे तात्काळ करावेत. संबंधितांकडे प्रस्ताव पाठवावा. यावेळी कृषिभूषण साहेबरावदादा पाटील यांनी निवेदनासोबत प्रक्रिया उद्योगातून स्वनिर्मित तयार केलेले 'सिंदूर'रही आमदार अनिलदादा पाटील यांना दिले.



ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!!
डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234
वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# अक्षया नवमी



अक्षया नवमीच्या दिवशी आवळ्याच्या झाडाची पूजा करण्याची पद्धत आणि धार्मिक महत्त्व जाणून घ्या.

कार्तिक महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या नवव्या दिवसाला अक्षय किंवा आमला नवमी म्हणतात. या दिवशी केलेली पूजा वाया जात नाही, असे म्हटले जाते. अक्षया नवमीच्या दिवशी आवळ्याच्या झाडाची पूजा कशी करावी जाणून घ्या.

### अक्षय नवमी ही कार्तिक महिन्यासाठी शुभ

अक्षय नवमी ही पंधरवड्याच्या नवव्या दिवशी असते. यावेळी नवमी ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी होती. या दिवशी पूजा करणे पुण्यपूर्ण मानले जाते. ज्योतिषशास्त्रानुसार असे केलेले दान स्नान, पूजा आणि उपवास शाश्वत फळे म्हणजेच कधीही न संपणारे पुण्य प्रदान करतात, असे मानले जाते. अक्षय नवमीला आमला नवमी असे देखील म्हटले जाते. या दिवशी केलेले कोणतेही शुभ कार्य किंवा दान कधीही संपत नाही. त्याचे फळ 'अक्षय' म्हणजेच शाश्वत राहते.

### अक्षया नवमी शुभ मुहूर्त

पंचांगानुसार कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील नवमी तिथीची सुरूवात यावर्षी गुरुवार, ३० ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०६ वाजता सुरू झाली. ही तिथी दुसऱ्या दिवशी म्हणजे ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी १०.०३ वाजेपर्यंत चालली. अशा वेळी नवमी शुक्रवार, ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी होती. या दिवशी पूजा करण्यासाठी शुभ मुहूर्त सकाळी ६.०६ ते १०.०३ वाजेपर्यंत होती.

### आवळ्याच्या झाडाची पूजा कशी करायची?

सर्वांत पहिले आवळ्याच्या झाडाच्या खोडाला पाणी घाला. झाडाच्या खोडाभोवती कच्चा धागा म्हणजे कलवा गुंडाळा. त्यामध्ये फळे, फुले, धूप, दिवे, रोली, चंदन इत्यादींनी त्याची पूजा करावी. त्यानंतर आरती करून १०८ वेळा प्रदक्षिणा घालावी. पूजा झाल्यानंतर झाडाखाली बसून तुमच्या मनातील सर्व इच्छा व्यक्त कराव्यात. तुमच्या क्षमतेनुसार कपडे, अन्न, सोने, चांदी किंवा फळे आणि भाज्या दान करा. दान केल्यामुळे पुण्य लाभते, अशी मान्यता आहे. पूजा झाल्यानंतर आवळ्याच्या झाडाखाली ब्राह्मणांना जेवण द्या आणि स्वतः नैवेद्याचे सेवन करा. असे केल्याने देवी लक्ष्मी प्रसन्न होते. तुमच्या घरात सुख आणि समृद्धी येते.

### अक्षय नवमीला काय फायदे होतात?

अक्षय नवमीच्या दिवशी केलेल्या दानामुळे सत्कर्म जीवनात सुख, शांती आणि समृद्धी आणतात. यावेळी भगवान विष्णू आणि माता लक्ष्मी यांच्या आशीर्वादाने घरात धन आणि समृद्धी वाढते. या दिवशी उपवास केल्याने मुलांच्या कल्याणासाठी आणि दीर्घायुष्यासाठी आशीर्वाद मिळतो.

### ३० की ३१ कधी अक्षया नवमी? जाणून घ्या शुभ मुहूर्त, पूजा पद्धत आणि महत्त्व

### अक्षय नवमीचे महत्त्व

अक्षय्य नवमीच्या तिथीला अक्षय्य तृतीयेसारखेच महत्त्व आहे. या दिवशी द्वापारयुगाची सुरूवात होते. हा दिवस भगवान विष्णूंना समर्पित आहे. या दिवशी स्नान करणे, दान करणे, तर्पण अर्पण करणे, पूजा करणे आणि इतरांची सेवा करणे याचे पुण्य कधीही संपत नाही आणि ते अनेक जन्मांपर्यंत व्यक्तीसोबत राहते. भगवान विष्णू यांनी आवळ्याच्या झाडाच्या रूपात सृष्टीची स्थापना केली, असे पौराणिक कथेनुसार म्हटले जाते. या दिवशी भगवान विष्णू आवळ्याच्या झाडात निवास करतात म्हणून या दिवशी आवळ्याच्या झाडाची पूजा केल्याने व्यक्तीची सर्व पापे नष्ट होतात आणि त्याला प्रत्येक कामात यश मिळते. आवळ्याच्या झाडाखाली जेवल्याने आजारातून बरे होण्यास मदत होते. आरोग्य चांगले राहते. तसेच या दिवशी माता लक्ष्मी यांना नैवेद्य दाखविणे अतिशय शुभ मानले जाते.

# गोवर्धनपूजा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



मुख्य गोवर्धन पर्वत ज्यांना जवळ असेल त्यांनी त्याची पूजा करावी. ज्यांना त्या खऱ्या गोवर्धनाची पूजा करणे अशक्य असेल अशांनी गाईच्या शेणाचा अथवा भाताचा गोवर्धन करून त्याच्यासह श्रीकृष्ण यांचे पूजन करावे. पूजा करताना–

**'श्रीकृष्णप्रीत्यर्थ गोवर्धनपूजनं गोपालपूजनात्मकं महोत्सवं करिष्ये।'**

असा संकल्प करून–

**'बलिराज्ञे द्वारपालो भवानद्य भवप्रभो। निजवाक्यार्थनार्थाय सगोवर्धन गोपते॥**

या मंत्राने गोवर्धनासह गोपालाचे आवाहन करून त्याची स्थापना करावी. नंतर

**'गोपालमूर्ते विश्वेश शक्रोत्सव विभेदक। गोवर्धन कृतच्छत्र पूजां मे हर गोपते॥ गोवर्धनधराधार गोकुलत्राणकारक। विष्णुबाहुकृतच्छाय गवां कोटिप्रदोभव॥'**

या मंत्रांनी गोपालासह गोवर्धनाची षोडशोपचारे पूजा करावी. वैभवानुरूप महानैवेद्य द्यावा. त्यानंतर पूजेच्या अंगभूत अशा जीवंत अथवा मातीच्या गाईची वरील मंत्रांनी पूजा करून–

**'आगावो अग्मन्प्रैते वदन्तु।'**

या दोन ऋचांनी घरात तयार केलेल्या भाताने होम करावा. नंतर ब्राह्मणांना अन्न व गाय वगैरेचे दान केल्यावर गाईला गवत व गोवर्धनाला बलिदानही अर्पण करावीत. शेवटी गाईसह वर्तमान आपण– गाई, ब्राह्मण व गोवर्धनगिरी यांना प्रदक्षिणा घालावी.

# कार्तिक शु. दशमी अन् आवळी भोजन

कार्तिक शुद्ध दशमीपासून पौर्णिमेपर्यंत एखाद्या दिवशी आवळीच्या झाडाखाली स्वयंपाक करून इष्टमित्रांसह भोजन करतात. पूजाविधी आवळी पूजनाप्रमाणेच असतो. महाराष्ट्रात व कर्नाटकात देवस्थान असेल त्या ठिकाणची देवाची मूर्ती पालखीत बसवून आवळीच्या झाडाखाली आणतात. त्यानंतर देवाला तेथे महानैवेद्य करून भोजन झाल्यावर सायंकाळी देव मिरवणुकीने देवळात परत नेतात.

**आशा दशमी**

कार्तिक शुद्ध दशमी या तिथीस हे व्रत करतात. अन्य कोणत्याही शुद्ध दशमीस हे व्रत चालू करता येते. धनलाभ, राज्यलाभ, व्यापारात बरकत, पुत्रप्राप्ती, शेतीची भरभराट इत्यादी आशार्थी लोक हे व्रत करतात. स्नानानंतर स्वच्छ व पवित्र जागी जवाच्या पीठाने सायुध व स्वस्वरूपयुक्त इंद्रादी दिक्पालांची नावे लिहून त्यांची पूजा करावी. गंध–फूले वाहून त्या ऋतूतील फळे व तूपयुक्त अन्नपदार्थांचा नैवेद्य दाखवावा. दिवे प्रज्वलित करून–

**'आशा:खाशा: सदा सन्तु सिद्ध्यंतां मे मनोरथा:। भवतीनां प्रसादेन सदा कल्याणमस्तिवति।'**

अशी प्रार्थना करावी. संपूर्ण वर्षभर असे व्रत केल्यास इच्छित अपेक्षा फळास येतात.

**सार्वभौम व्रत**

या शुद्ध दशमीला प्रात:स्नान करून नक्तव्रत करण्याची प्रतिज्ञा करावी. गंध–फूल इत्यादींच्या साह्याने दिशांची पूजा करून दहीभाताचा शुद्ध बली द्यावा. त्यावेळी

**'सर्वा भक्त्य: सिध्यन्तु मम जन्मनि जन्मनि।'**

अशी प्रार्थना करून मध्यरात्री दहीभात खावा. एक वर्षापर्यंत प्रत्येक शुद्ध दशमीला असे व्रत केल्यास सर्वत्र यश लाभते.

**ब्रह्मप्राप्तीव्रत**

कार्तिक शुद्ध दशमी किंवा कोणत्याही शुद्ध दशमी रोजी (१) आत्मा (२) आयू (३) मन (४) दक्ष (५) मद (६) प्राण (७) हविष्मान (८) गर्विष्ठ (स्वर्गस्थ) (९) दत्त व (१०) सत्य यांची आणि अंगीरस यांची यथाविधी पूजा करून उपवास केल्यास ब्रह्मपद मिळते.

# पांडव पंचमीचे महत्त्व काय? तिलाच 'लाभ पंचमी' असे का म्हणतात?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षातील पंचमी तिथीला 'पांडव पंचमी' म्हणून ओळखले जाते. दिवाळीतील महत्त्वाच्या सणांपैकी हा एक दिवस. हा दिवस केवळ पांडवांच्या पराक्रमाचे स्मरण करण्यासाठी नव्हे, तर त्यांच्यातील आदर्श गुण आत्मसात करण्यासाठीही साजरा केला जातो. महाराष्ट्रासह गुजरात आणि जैन समाजात या दिवसाचे विशेष महत्त्व आहे. पांडव पंचमी साजरी करण्यामागे मुख्यतः दोन प्रमुख कारणे आहेत.

### १) पांडवांचा विजय दिवस

**विजयाचे प्रतीक :** महाभारतातील घनघोर युद्धात भगवान श्रीकृष्ण यांच्या मार्गदर्शनाखाली पांडवांनी बलाढ्य कौरवसेनेचा पराभव केला. हा विजय सत्प्रवृत्तीचा अधर्मावर विजय दर्शवितो. हा दिवस पांडवांच्या शौर्य, धर्मनिष्ठा आणि धैर्याचे प्रतीक म्हणून साजरा केला जातो.

**अज्ञातवासातून प्रकट :** एका मान्यतेनुसार कौरवांकडून द्युतात पराभूत झाल्यानंतर पांडवांनी १२ वर्षांचा वनवास आणि १ वर्षाचा अज्ञातवास भोगला. याच कार्तिक शुक्ल पंचमीच्या दिवशी पांडव अज्ञातवासातून प्रकट झाले होते, म्हणून हा दिवस विशेष मानला जातो.

### २) आदर्श गुणांचे स्मरण

पाच पांडवांमध्ये असलेले आदर्श गुण (युधिष्ठिराची धर्मनिष्ठा, भीमाचे सामर्थ्य, अर्जुनाची निष्ठा, नकुल–सहदेवाचे ज्ञान) आपल्यात यावेत, यासाठी त्यांचे पूजन केले जाते. कौरव (दुष्ट प्रवृत्ती) कितीही बलवान असले तरी पांडवांसारख्या (सत्प्रवृत्ती) व्यक्तीवर विजय मिळवू शकत नाहीत, याची आठवण देणारा हा दिवस आहे. हा दिवस वेगवेगळ्या प्रकारे साजरा केला जातो

**पांडवांचे प्रतीक पूजन :** या दिवशी गायीच्या शेणापासून (गोमय) पांडवांचे प्रतीकात्मक रूप (पाच पिंड किंवा मूर्ती) तयार करून त्यांची पूजा केली जाते. (शहरी भागात शेण उपलब्ध नसल्यास, पाटावर पाच सुपारी ठेवून किंवा कृष्ण–पांडवांचे चित्र ठेवून मानसपूजा केली जाते.)

**षोडशोपचार पूजा :** पांडवांच्या या प्रतीकांना हळद, कुंकू, अक्षता, फुले अर्पण केली जातात.

**नैवेद्य :** पांडवांना लोणी आणि खडीसाखर यांचा नैवेद्य दाखविला जातो. काही ठिकाणी गोड पदार्थ किंवा पंचपक्वान्न देखील बनविले जातात.

**व्रत आणि कथा :** या दिवशी अनेक जण उपवास करतात. पांडवांसारखे गुणवान पुत्र मिळावेत, यासाठी स्त्रिया हे व्रत करतात. पांडवांचे स्मरण करून महाभारत कथा किंवा पांडवांच्या पराक्रमाची कथा वाचली किंवा ऐकली जाते. पांडव पंचमीला वेगवेगळ्या प्रादेशिक नावानेही ओळखले जाते.

### लाभ पंचमी (गुजरात)

गुजरातमध्ये दिवाळीचा शेवटचा दिवस म्हणून 'लाभ पंचमी' साजरी होते. या दिवशी व्यापारी लोक आपले नवीन खाते (खतावणी) उघडून कार्य सुरू करतात. याला 'सौभाग्य पंचमी' असेही म्हणतात.

### ज्ञान पंचमी (जैन धर्म)

जैन धर्मात या तिथीला 'ज्ञान पंचमी' म्हणून साजरी करतात. या दिवशी ज्ञान आणि ग्रंथांची पूजा करून श्रुतज्ञान प्राप्त करण्याची प्रार्थना केली जाते.

### कडपंचमी (महाराष्ट्र)

महाराष्ट्रातील काही भागांत या दिवशी गोड पदार्थ न बनवता कडू पदार्थांचे (कडधान्यांचे) सेवन करण्याची परंपरा आहे म्हणून याला 'कडपंचमी' म्हणतात. पांडव पंचमी हा केवळ सण नव्हे, तर तो धर्म, धैर्य आणि सतचरित्र्य यांचे महत्त्व सांगणारा दिवस आहे. या दिवशी पांडवांचे स्मरण करून त्यांच्यासारखे आदर्श गुण आपणही आत्मसात करायला हवेत.

### पांडव पंचमी का साजरी केली जाते? आख्यायिका महत्त्व व मान्यता

दिवाळी झाल्यावर म्हणजेच कार्तिक महिन्यातील पाचव्या दिवशी आपण पांडव पंचमी साजरी करतो. व्यासांनी लिहिलेल्या महाभारतानुसार याच दिवशी कुरुक्षेत्रात पांडवांनी कौरवांना हरवून हस्तिनापुरीवर विजय मिळविला होता. यंदाची पांडव पंचमी २७ ऑक्टोबर रोजी साजरी झाली. दिवाळी झाल्यावर म्हणजेच कार्तिक महिन्यातील पाचव्या दिवशी आपण पांडव पंचमी साजरी करतो. तुम्हाला प्रश्न पडला असेल, की पांडव पंचमी का साजरी केली जाते? तर पांडवांनी कौरवांवर विजय मिळविला तो दिवस आपण पांडव पंचमी म्हणून साजरा करतो. लग्न झालेल्या आणि संतती प्राप्तीसाठी स्त्रिया घरासमोर शेणाच्या गोळ्यांचे पाच पांडव मांडतात. प्रत्येक पांडवाची पूजा करून त्यांच्यासारखे गुणी बाळ व्हावे म्हणून आराधना करतात. पांडव पंचमीची सविस्तर माहिती म्हणजे पूजेचा विधी, महत्त्व आणि आख्यायिका आपण जाणून घेऊया.

व्यासकृत महाभारतानुसार हस्तिनावतीच्या सिंहासनावरून कौरव व पांडवांमध्ये युद्ध झाले, हे सर्वज्ञात आहेच. त्यावेळी भगवान श्रीकृष्ण यांच्या मार्गदर्शनाखाली पांडवांनी कौरवांशी लढाई केली. राहायला छप्पर नाही, वडिलांचे छत्र नाही, पुरेसे मनुष्यबळ नाही, युद्धासाठी लागणारी दौलत नाही अशा परिस्थितीत सुद्धा कठोर परिश्रम करून हस्तिनावतीत आपले स्थान निर्माण केले. आपल्या गुणांच्या बळावर खांडवप्रस्थाचे राज्य उभे केले. तसेच वनवासात व अज्ञातवासात जाऊन आल्यानंतर हस्तिनावतीसारख्या प्रतिष्ठित सिंहासनाला आव्हान करून सिंहासन जिंकून घेतले. भावांच्या विरुद्ध विचार आणि मतांचा आदर करत आपल्यातील एकजूट कायम ठेवली. आईचा प्रत्येक आदेश शिरोधार्य मानला. आपल्यावरील अन्यायाचे निराकरण केले. अशी गुणी व विजयी मुले आपल्यालाही व्हावीत म्हणून प्रत्येक आई पांडव पंचमीच्या दिवशी पांडवांची पूजा करून गुणी, आज्ञाधारक व बलवान मुलांनी आपली कूस उजळावी, अशी प्रार्थना करते.

### पांडव पंचमीची आख्यायिका काय आहे?

महाभारतातील दोन महत्त्वाचे घटक म्हणजे पांडव आणि कौरव. भगवान श्रीकृष्ण यांच्या मार्गदर्शनाखाली युद्ध करून अल्प संख्याबळ असूनही बलाढ्य अशा कौरवसेनेचा नायनाट करणाऱ्या पांडवांनी जगासमोर मोठा आदर्श उभा केला. पांडवांसारखे गुण आपल्यात यावेत, यासाठी हा दिवस साजरा करतात, अशी मान्यता आहे. द्युतात कौरवांकडून हरलेल्या पांडवांना कबूल केल्याप्रमाणे १२ वर्षे वनवास व १ वर्ष अज्ञातवासात काढावे लागले. कार्तिक शुक्ल पंचमीला पांडव अज्ञातवासातून प्रकट झाले. आपण ऋषीपंचमी साजरी करतो त्याप्रमाणे भारतीय संस्कृतीत पांडव पंचमीदेखील साजरी केली जाते.

### पांडव पंचमी म्हणजे

पांडवांच्या विजयामुळे त्यांची पूजा करून त्यांच्यात असलेले शौर्य, वीरता आणि आदर्श गुणांचे पूजन करण्याची परंपरा प्रचलित असल्याचे दिसून येते. संपूर्ण देशभरात पांडवांसारखे पुत्र घराघरात जन्माला यावेत आणि पांडवांचे गुण, शौर्य, वीरता आणि हार न मानण्याची शक्ती आपल्या अपत्यात यावी, यासाठी पांडवांची पूजा मोठ्या भक्तीभावाने करण्याची परंपरा प्रचलित आहे. यावेळी भगवान श्रीकृष्ण यांचे पूजनही आवर्जून केले जाते. या दिवशी भगवान श्रीकृष्ण यांचा नामजप अधिकाधिक करावा. पांडव पंचमीला गोमयापासून पांडव सिद्ध करतात आणि त्यांची पूजा करतात. छत्तीसगडच्या बिजापूर जिल्ह्याचे पुजारी कांकेर गावात आजही पांडवांची पूजा केली जाते. येथे दर दोन वर्षांनी एका मोठ्या यात्रेचे आयोजन केले जाते. कौरवांकडून सर्व काही गमावल्यानंतर पांडव दंडकारण्य भागात काही काळासाठी वास्तव्यास होते. पांडव अज्ञातवासात गेले असता त्यांनी या भागात आश्रय घेतला होता. त्यामुळे या डोंगराचे नाव 'पांडव पर्वत' पडले. या पर्वतावरून पांडव भोपाळत्तनमजवळील सक्काळनारायण गुहेत श्रीकृष्णाची मूर्ती असल्याचे पाहावयास मिळते.

### हिंदू संस्कृतीत पांडवांची पूजा कशी मांडतात?

पहाटे सूर्योदयानंतर दारात रांगोळी, समोर पाट किंवा चौरंग मांडून त्यावर पाच पाने मांडली जातात. त्यावर सकाळच्या ताज्या शेणाचे पाच गोळे मांडले जातात. त्यांच्यावर निवडुंगाच्या झाडाचे दिवे रोवून एक दिवा विहिरीजवळ किंवा जवळच्या जलस्थानाजवळ ठेवला जातो. हडप्पा संस्कृतीच्या काळातही लाडू बनविले जायचे.

पांडव पंचमीचीला जैनांची ज्ञानपंचमी देखील म्हणतात. कार्तिक शुद्ध पंचमी हा दिवस जैन संस्कृतीत ज्ञानपंचमी म्हणून साजरा केला जातो. हा दिवस जैन बांधव मोठ्या उत्साहात साजरा करतात. जैन प्रार्थनास्थळांमध्ये या दिवशी विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. कार्तिक शुद्ध पंचमी हा ज्ञानपूजेचा दिवस मानला जातो. या दिवशी ध्यान व प्रार्थना केल्यास 'दुसरा सूर्य' म्हणजेच 'ज्ञान' प्राप्त होते, अशी मान्यता असल्याचे म्हटले जाते. ज्ञानपंचमी एक सण म्हणून जैन बांधव साजरा करतात.

